UPA
IMPACT FACTOR 5.473 (SJIF)
UPA NATIONAL E-JOURNAL
Interdisciplinary Peer-Reviewed Indexed Journal
ISSN 2455-4375

# पर्यावरणीय समस्या-: आंतरराष्ट्रीय सुरक्षेसमोरील अलष्करी धोका

**प्रा. दिपकराव बी. देवरे**
संरक्षण व सामरिकशास्त्र विभाग
पंकज महाविद्यालय,
चोपडा.जि.जळगांव

.......................................................................................................................

**प्रस्तावना:-**

पर्यावरण ही निर्सगाची एक महत्वपुर्ण देणगी आहे. पर्यावरणातील सजीव, निर्जीव, पाणी, हवा, माती या सर्व घटकांमध्ये एक क्रमबध्द व व्यवस्थित संघटन असते. मानव हा स्वत: पर्यावरणाचा एक महत्वाचा घटक आहे. मानव हा पर्यावरणातील सर्व घटकांमध्ये एक सर्वश्रेष्ठ व बुध्दीमान घटक आहे. मानवाच्या गरजा अनंत असुन त्या पुर्ण करण्यासाठी मानव पर्यावरणातील घटकांचा वापर करतो. मानवाच्या वाढत्या व अतिरेकी हस्तक्षेपामुळे पर्यावरणात असंतुलन निर्माण होवुन पर्यावरणाचा -हास होत आहे. पर्यावरणाची गुणवत्ता ढासळत आहे. विविध पर्यावरणीय घटकांचे प्रदुषण होत आहे.

जागतिक सुरक्षेसमोर पर्यावरण सुरक्षेच्या असंख्य प्रश्नांनी प्रश्नचिन्ह उभे केले आहे. पर्यावरणीय धोके हे सुरक्षेच्या इतर धोक्यांच्या तुलनेत अतिशय विनाशकारी आहेत. पर्यावरण सुरक्षेची समस्या निर्माण झाल्याने त्यांच्या दुष्परिणामांना आता सुरुवात झाली आहे. पर्यावरणाच्या धोक्यांमुळे होणारी प्राणहानी व आर्थिक नुकसान अमर्याद असते. या पर्यावरण आपत्तींचा सामना करणे मनुष्य जातीच्या क्षमतेपलीकडची बाब आहे. नैसर्गिक साधनांची कमतरता उर्जेसाठीचा संघर्ष पाणी आणि अन्नधान्याची निर्माण झालेली चणचण यामुळे जगातील अनेक भागात अशांतता निर्माण झालेली आहे. 21 व्या शतकात जगाच्या सुरक्षेला युध्द व दहशतवाद यासारख्या बाबींपेक्षा पर्यावरणीय विषयांमुळे अधिक गंभीर धोका निर्माण झालेला आहे. पर्यावरणामुळे निर्माण होणा-या समस्यांना सर्वच राष्ट्रे कमी अधिक प्रमाणात जबाबदार आहेत.

**पर्यावरण सुरक्षा:-**

सुर्यमालेतील पृथ्वी हा एक प्रमुख ग्रह आहे. याच पृथ्वीवर असलेल्या अनुकुल परिस्थितीमुळेच सजिवांची वाढ व त्यांचा विकास मोठया प्रमाणात झाला, या परिस्थितीलाच पर्यावरण असे म्हणतात. मानव हा सजीवांमध्ये सर्वात बुध्दीमान म्हणुन ओळखला जातो. मानवाने याच पर्यावरणाच्या सहकार्याने आपला सर्वांगिण विकास घडवुन आणलेला दिसतो. मानवाने जे बदल घडवुन आपला विकास घडवुन आणलेला आहे. त्याचे दुरगामी परिणाम पर्यावरणावर होत आहेत. यातुनच पर्यावरणाची सुरक्षा किंवा समस्या निर्माण झालेली आहे.

पर्यावरणीय समस्या किंवा सुरक्षा मानवामुळे प्रामुख्याने निर्माण झालेल्या आहेत. कारण मानवाने निर्माण केलेल्या विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या आधारे त्याने पर्यावरणात आपला प्रभाव निर्माण केला. त्यातुनच ज्या समस्या किंवा परिणाम निर्माण झालेले आहेत. ते मानवालाच दीर्घकाळपर्यंत भोगावे लागणार आहेत. पर्यावरणातील घटक जर मानवाला अनुकुल असतील तर मानवाचा विकास निश्चितच होईल, पण हे घटक जर प्रतिकुल असतील तर मात्र मानवाच्या विकासात मोठया प्रमाणात अडथळे निर्माण होतील. मानवाने आपला विकास करत असतांना केलेले हवेचे व पाण्याचे प्रदुषण, नैसर्गिक साधनसंपत्तीची चालवलेली मोठया प्रमाणावरील लुट, यामधुन होत असलेली जागतिक तापमानवाढ यासारखे प्रश्न आज मानवापुढे उभे राहिलेल

आहेत. म्हणजेच हे प्रश्न किंवा संकटे मानवामुळेच निर्माण झालेले असल्यामुळे त्यांचा अभ्यास हा पर्यावरणीय समस्या किंवा सुरक्षा म्हणुन महत्वाचा आहे.

आज प्रदुषण ही आंतरराष्ट्रीय समस्या बनलेली आहे. पुर्वी लोकसंख्या मर्यादीत होती. औद्योगिकीकरण नसल्याने कारखाने नव्हते. त्यामुळे त्यावेळी पर्यावरणात सोडली जाणारी प्रदुषित पदार्थांचे प्रमाण मर्यादीत होते. आज लोकसंख्या मोठया प्रमाणात वाढलेली आहे. औद्योगिकीकरणामुळे कारखान्यांची संख्या वाढलेली आहे. वाहनांची संख्या वाढलेली आहे. रासायनिक द्रव्यांचा वापर वाढला आहे. शेतीतील कामे विविध यंत्रे, उपकरणे व बांधकामे यामुळेही विषारी वायूंचे उत्सर्जन होते आहे. त्यामुळे पर्यावरणाचे असंतुलन वाढते आहे.

**पर्यावरण असंतुलनाच्या दुष्परिणामांना प्रारंभ:-**

पर्यावरणाचे ढासळते संतुलन, त्यामुळे जागतिक हवामानात होणारे विनाशकारी बदल, तापमानवृध्दी या भयावह समस्यांचे महाभयंकर रुप अजुन समोर आलेले नसले तरी, त्यांच्या दुष्परिणामांना आता प्रारंभ झालेला आहे. 21 व्या शतकात जगाच्या सुरक्षेला कोणताही देश किंवा दहशतवादी संघटना याहीपेक्षा पर्यावरणाच्या ढासळलेल्या संतुलनामुळे निर्माण झालेली असुरक्षा अधिक धोकेदायक असल्याचे तज्ञांचे एकमत आहे. चिकनगुनिया, स्वाईन फल्ू, बर्ड फलु आणि इबोला याबरोबर चीनमधुन संपुर्ण जगात पसरलेला कोविड-19 ऊर्फ कोरोना यासारखे जीवघेणे आजार वा-याच्या वेगाने पसरत आहे. मधुमेह, हृदयरोग, रक्तदाब व एडस या आजारांचे प्रमाणही वेगाने वाढते आहे.

आंतरराष्ट्रीय सुरक्षा समस्यांमध्ये पर्यावरणासारख्या गैरलष्करी विषयाला महत्व मिळु लागले आहे. काही वर्षांपासुन महापुर, भुकंप, वादळ, बर्फवृष्ट्री, दुष्काळ यासारख्या नैसर्गिक आपत्तींचीं संख्या व त्यामुळे झालेली हानीही मोठया प्रमाणात वाढलेली आहे. कारण पर्यावरणाच्या समस्येने संपुर्ण पृथ्वीचेच अस्तित्व पणास लागलेले आहे. संपुर्ण मानवजात त्यामुळे प्रभावित होणार आहे.

पर्यावरण म्हणजे आपल्या सभोवतालची परिस्थिती यात जमीन, हवा व पाणी या तीन मुख्य घटकांचा समावेश होतो. परंतु प्रदुषणामुळे मानवी जीवनाला आवश्यक अशा तिन्हीं घटकांमधील प्रदुषणाचे प्रमाण पराकोटीचे वाढलेले आहे. पर्यावरण या विषयाला धर्म, पंथ, देश, वंश किंवा राजकीय विचारधारा यांना असतात असे कोणतेही बंधन नाही.

पर्यावरण हा विषय संपुर्ण मानवजातच नव्हे, तर सजीव सृष्टीशी संबंधीत असल्याने त्याचा विचार करणे आता सर्वच देशांना बंधनकारक आहे. कारण हा मानवी संस्कृतीच्या अस्तित्वाचा प्रश्न आहे. कारण पर्यावरणाच्या समस्या या कोण्या एका देशाला भोगाव्या लागणार नाही, तर पृथ्वी म्हणजेच जगाच्या पाठीवर कुठेही पर्यावरणविषयी समस्या निर्माण झाल्या तर तिचे परिणाम हे सर्व देशांना भोगावे लागतील. पर्यावरण समस्येला आज सर्वात मोठी वैश्विक समस्या मानले जावु लागले आहे. वेगवेगळी राष्ट्रे व मानवी समुह थोडयाफार फरकाने पर्यावरण समस्येला सारख्या प्रमाणात जबाबदार आहे. वाढते औद्योगिकरण, नैसर्गिक संसाधनांचे वारेमाप दोहन, लोकसंख्येची अवास्तव वृध्दी यामुळे पर्यावरणाची समस्या निर्माण झालेली आहे. त्याचा दुष्परिणाम हवामानाच्या पध्दतीवर पध्दतीवर होतो आहे. पर्यावरणाचे सर्व घटक परस्परावलंबी असुन त्यांच्यावर मानवजात अवलंबुन आहे. पृथ्वीवरील सर्व प्रकारच्या जीवनासाठी हवा व पाणी यांची गरज ही प्राथमिक गरज आहे. तिच प्रदुषित झाले,तर सर्व सजीवांना जगणे अशक्यप्राय ठरु लागले आहे.

प्रदुषणाचे असंख्य प्रकार आहेत त्यात वायुप्रदुषण, जलप्रदुषण, ध्वनी प्रदुषण हे प्रमुख आहेत. प्रदुषणामुळे जमीनीवरील मातीच नव्हे तर मातेचे दुधही प्रदुषित झाले आहे. आज मोठया प्रमाणात जंगले तोडली जात आहेत. 1950 पासुन आजपर्यंत अर्धे जंगल विविध कारणांमुळे नष्ट झाले आहेत. यामुळे जमिनीची धुप होवुन सुपीक जमिनीचे प्रमाण कमी होत आहे. वैज्ञानिक पध्दतीने करण्यात येण्णरे मासेमारी, समुद्राच्या पाण्यात सोडले जाणारे प्रदुषित पाणी, तेलगळती, अपघात, तेल विहीरींमधुन होणारे प्रदुषणयामुळे समुद्राचे संतुलन बिघडले आहे. याचेही अनेक दुष्परिणाम मानवाला दीर्घकाळ भोगावे लागणार आहेत. पर्यावरण सुरक्षेविषयी जागरुकता निर्माण व्हावी या दृष्टीने जगात काही अशासकीय आंतरराष्ट्रीय संस्था स्थापन झाल्या.त्यात 1961 मध्ये वर्ल्ड वाईड फंउ, 1969 मध्ये फ्रेंड ऑफ अर्थ व 1971 मध्ये ग्रीनपीस यांचा समावेश आहे. पर्यावरणाचे संतुलन ही केवळ एक आंतरराष्ट्रीय सुरक्षेची समस्या नाही तर ती संपुर्ण मानव जातीच्या अस्तित्वाची ही समस्या नाही तर ती संपुर्ण सजीव सृष्टी आणि या वसंुधरेच्या अस्तित्वाची समस्या आहे. पर्यावरण सुरक्षा ही शांतता राष्ट्रीय सुरक्षा आणि मानवी हक्क यांचाही महत्वपुर्ण पैलु आहे. येत्या 100 वर्षात या समस्येत आणखीनच भर पडलेली असेल असे वाटते. नैसर्गिक साधनांचा उपयोग रोखणे सजीव सृष्टीची पुनर्स्थापना पर्यावरण असंतुलनाला प्रतिबंध पर्यावरणस्नेही विकास आणि निर्सगाची अवनती थांबवणे या विविध अगांनी पर्यावरण सुरक्षा या विषयाचा अभ्यास करणे त्यासाठी आवश्यक आहे.

**संदर्भ ग्रंथ:-**

१. डॉ. व्ही.जे. पाटील- पर्यावरणशास्त्र, प्रशांत पब्लिकेशन जळगांव-2004
२. डॉ. कविता धर्माधिकारी, डॉ. तोडकर, डॉ. विसपुते- जागतिक सुरक्षा, प्रशांत पब्लिकेशन जळगांव-2005
३. डॉ. देवेंद्र विसपुते- आंतरराष्ट्रीय सुरक्षा समस्या, प्रशांत पब्लिकेशन-2020